ePaper

**“नियतीने मला राजकारणात आणलं”: पंतप्रधान नरेंद्र मोदी**




वर्ष - 8 । अंक -76 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 23 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- भारतीय क्रिकेट संघाने रचला इतिहास
- ऑलिम्पियाड करंडक भारताकडून गहाळ
- मुलगा डोळे दाखवायला लागला
- माझी फसवणूक झाल्यासारखं वाटतं


## विविध रस्त्यांच्या कामांना 300 कोटींचा निधी

# पुणे-बंगळुरु प्रवास आता कोंडीमुक्त!

## » नितीन गडकरींकडून हिरवा कंदिल, सादरीकरणाचे कौतुक

। पुणे । महाईन्यूज

**पुणे-बंगळुरू महामार्गाच्या पश्चिम बाह्यवळण मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस उग्र होत असून, वाहनचालकांच्या वेळेचा मोठा अपव्यय होत आहे. ही वाहतूक कोंडी फोडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांचे सादरीकरण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी केले. नितीन गडकरींनी या सादरीकरणाचे कौतुक करून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि पुणे वाहतूक पोलिसांना एकत्र बैठक घेण्यास सांगितले, त्यानुसार, दोन्ही यंत्रणांनी शनिवारी सायंकाळपर्यंत पश्चिम बाह्यवळण मार्ग वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी कृती आराखडा तयार केला आहे. त्यासाठी गडकरी यांनी ३०० कोटी रुपयांच्या खर्चाला तत्त्वतः मान्यता दिली आहे, अशी माहिती चंद्रकांत पाटील यांनी दिली.**



पुणे जिल्ह्याचे तत्कालीन पालकमंत्री व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पश्चिम बाह्यवळण मार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी प्रस्ताव व उपाययोजना सादर करण्याच्या सूचना पुणे वाहतूक पोलिसांना दिल्या होत्या. त्यानुसार, पोलिस आयुक्त अमितेशकुमार व अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे सरव्यवस्थापक अंशुमाळी श्रीवास्तव, प्रकल्प संचालक संजय कदम, महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर, महापालिकेचे वाहतूक नियोजनकार निखिल मिजार, आर्किटेक्ट मिलिंद रोडे आदी सहकाऱ्यांसमवेत आवश्यक उपाययोजनांचा अहवाल तयार केला आहे. पुणे शहर हे लोकसंख्येच्या दृष्टीने देशातील नवव्या क्रमांकाचे शहर आहे. पुणे महापालिकेत नव्याने २३ गावांचा समावेश झाल्यानंतर पुण्याचे क्षेत्रफळ ५१९ चौरस किलोमीटर झाले. भौगोलिकदृष्ट्या पुणे देशातील सर्वांत मोठी महानालिका आहे. पुण्यात वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. यातूनच निर्माण झालेली पुणे-बेंगळुरू महामार्गावरील कोंडीची समस्या लक्षातघेऊन त्यासाठीची उपाययोजना करण्यात येत आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी उपाययोजनांना तत्त्वतः मान्यता दिली आहे. त्यासाठी ‘एनएचआय’, पुणे महापालिका; तसेच पुणे पोलिसांना एकत्रित काम करण्यास सांगितले आहे. या उपाययोजनांनंतर या बासपासवरील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार आहे, असे उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले आहेत.

### बॉटल नेकमुळे रस्त्यांची कोंडी

पुणे-बेंगळुरू महामार्गावरील कात्रज-देहूरोड बाहावळण मार्गावर दररोज १० लाख वाहने ये-जा करीत असून, हा रस्ता चारपदरी झाला असला, तरी त्यावरील ‘बॉटल नेक’ मुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. गेल्या तीन वर्षांत १०० पेक्षा अधिक अपघात झाले असून, त्यात ६८ नागरिकांचे प्राण गेले आहेत. ५४ जण गंभीर जखमी झाले आहेत.

हा बाह्यवळण मार्ग वाहतूक कोंडीतून सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना प्रस्तावित विकासकामांविषयी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्यासमोर पुणे शहर वाहतूक पोलिसांनी सादरीकरण केले. त्यात या मार्गावरील अपघात मालिकांचे विदारक चित्र उघड झाले. हा रस्ता सहापदरी करण्याचा निर्णय २०१०मध्ये झाला. मात्र, मागील १४ वर्षांपासून हे काम संथ गतीने सुरू आहे. या रस्त्यालगत अनेक ठिकाणी सेवा रस्ते पूर्ण झालेले नाहीत. वाहनचालकांच्या अपघातात भर पडत आहे. या रस्त्याच्या विकासकामाचा वनवास संपविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज असून, त्याकडे पुणे शहर वाहतूक पोलिसांनी गडकरींचे लक्ष वेधले.

### नागरीकरणाचा रेटा

गेल्या ३० वर्षांत नऱ्हे, धायरी, नांदेड सिटी, उत्तमनगर, भूगाव, पिरंगुट, सूस, बाणेर, म्हाळुंगे, हिंजवडी, आणि किवळे या भागांत साधारणतः १० लाखांपेक्षा जास्त नागरिक राहण्यास आले आहेत. या बायपासच्या पश्चिमेला मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले असून, दक्षिणेकडे ‘आयटी पार्क’ विशेषतः हिंजवडीसह अनेक औद्योगिक व शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे या रस्त्यावरील गर्दी वाढली आहे.

### बायपासचा वापर वाढताच

पुणे वाहतूक पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पुणे शहरात गेल्या पाच वर्षांत सुमारे २० लाख वाहनांची वाढ झाली आहे. शहरात दररोज १,३०० नवीन वाहनांची भर पडते आहे. पुण्याला रिंग रोड नसल्याने पुणे-बंगळुरू रस्त्याचा चापर ‘रिंग रोड’ म्हणून करण्यात असून, सोलापूर, सासवड, सातारा, मुंबईकडून येणारी वाहने या रस्त्याचा वापर करीत आहेत. या बासपायची निर्मिती १९९४मध्ये दोन लेनचा महामार्ग म्हणून करण्यात आली होली. वाहनांची गर्दी वाढत असल्याने २००० मध्ये हा दुपदरी रस्ता चारपदरी करण्याचा निर्णय झाला. त्यानंतर २०१०मध्ये वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा रस्ता सहा पदरी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# बेंझला नोटीस देण्याच्या टायमिंगवर शंका!

## चाकणमधील प्रकल्पाला नियमांच्या उल्लंघनाचा ठपका

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मर्सिडिज बेंझच्या चाकणमधील प्रकल्पाला पर्यावरण नियमांच्या उल्लंघनाचा ठपका ठेवत आत्ताच नोटीस दिल्याने आश्चर्य वाटत आहे. इतके वर्षे लक्ष का घातले नाही? असा सवाल उपस्थित करून खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत शासनाने खुलासा करून नेमकी परिस्थिती काय आहे याची सविस्तर माहिती देण्याची मागणी केली. फलक लावून कोणी मुख्यमंत्री होत नाही, असेही त्या म्हणाल्या.**



एमपीसीबीने मर्सिडीज बेंझ कंपनीला या उत्तर देण्यासाठी १५ दिवसांची मुदत दिली आहे. या बाबत उत्तर न दिल्यास तसेच एमपीसीबीच्या सुचनांचे पालन न केल्यास जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ आणि वायू (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये कायदेशीर कारवाई केली जाईल, असे देखील नोटीशीत म्हटलं आहे.कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, गडहिंग्लज विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या चिंचवड येथे आयोजित कौटुंबिक स्नेहमेळाव्यात खासदार सुळे बोलत होत्या. मर्सिडीज बेंझ इंडियाने एमपीसीबीकडून पत्र मिळाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. 'एमपीसीबीकडून तीन आठवड्यांनंतर आज पत्र आले आहे. आम्ही त्याबाबत योग्य ती कारवाई करत असून या नोटीसील योग्य प्रतिसाद देऊ व अधिकाऱ्यांना सहकार्य करू, असे कंपनीने म्हटलं आहे. एमपीसीबी पुणेचे प्रादेशिक अधिकारी जे. एस. साळुंखे यांनी २३ ऑगस्ट आणि ४ सप्टेंबर रोजी कारखान्याची पाहणी केल्यानंतर नोटीस बजावण्यात आल्याचे सांगितले आहे. साळुंखे म्हणाले, 'मंडळाने दिलेल्या संमतीने घालून दिलेल्या अटींचे पालन करण्यात कंपनी अपयशी ठरल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रक्रिया न केलेले व अंशत: प्रक्रिया केलेले सांडपाणी व प्रदूषणास करणी भूत ठरणारे वायू उत्सर्जन होत आहे.या पाहणीदरम्यान लक्षात आलेला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रकल्पाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे (ईटीपी) सेंट्रीफ्यूज युनिट कार्यान्वित नव्हते. तसेच कंपनीत रिव्हर्स ऑस्मोसिस (आरओ) रिजेक्टवर उपचार करण्यासाठी आवश्यक मल्टी इफेक्ट बाष्पीभवन (एमईई) व उत्तेजित थिन फिल्म ड्रायर (एटीएफडी) कंपनीत नव्हते. निवडणुकीसाठी आम्ही तयार आहोत. मी पैशाला ताकद समजत नाही. लोकांच्या ताकदीवर विश्वास ठेवते. पैसे आणि सत्ता चालली असती तर मी निवडूनच आले नसते', असे सांगून सुळे म्हणाल्या, 'लोकसभा सचिवालयाने शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला अधिकृत कार्यालय दिले आहे.

त्यामुळे अदृश्य शक्तीला खरा पक्ष कोणता हे उशिरा कळले. फलक लावून कोणी मुख्यमंत्री होत नाही. जनता ठरवते.

स्वाभिमानी महाराष्ट्रातील जनतेची सेवा करण्याचे कर्तृत्व असलेली व्यक्ती मुख्यमंत्री व्हावी. त्यात महिला किंवा पुरुष असला तरी चालेल. पुढील आठ दिवसांत जागा वाटप पूर्ण होईल. महागाई, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार हे गंभीर प्रश्न घेऊन आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.

'प्रदूषण नियंत्रणाच्या महत्त्वाच्या उपाययोजनांचे पालन करण्यात प्रकल्प अपयशी ठरल्याने पर्यावरणविषयक नियमांचे उल्लंघन झाले आहे, असे या नितीशीत म्हटलं आहे.

प्रक्रिया न केलेले व अर्धवट प्रक्रिया केलेले सांडपाणी सोडणे, हवेचे प्रदूषण व कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेले उपकरणे अद्ययावत नसणे अशा अनेक मुद्द्यांचा समावेश या नोटीशीत करण्यात आला आहे.

### विरोधी पक्षनेत्यांनी टीका केली

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) मर्सिडीज बेंझ कंपनीच्या चाकण येथील प्रकल्पाला पर्यावरणविषयक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी प्रकल्पाला भेट दिल्यानंतर महिनाभरानंतर शुक्रवारी त्यांनी ही नोटीस बजावली आहे. एमपीसीबीचे अध्यक्ष सिद्धेश कदम यांनी मर्सिडीज बेंझ प्रकल्पाला भेट महिन्या भरपूर्वी भेट दिली होती. या भेटीनंतर बोर्डाने सोशल मीडियावरील महत्त्वाच्या पोस्ट डिलीट केल्याने तपासणी व कारवाई बाबत दिरंगाईवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आले होते. या बाबत विरोधी पक्षनेत्यांनी टीका केली होती.

# टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटारच्या दरात वाढ

## मागणी वाढल्याने गाजर, ढोबळी मिरचीच्या दरात वाढ झाली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मागणी वाढल्याने टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटार, गाजर, ढोबळी मिरचीच्या दरात वाढ झाली. फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी ज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली.**

गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक किंचित वाढली.मागणी वाढल्याने टोमॅटो, फ्लॉवर, शेवगा, मटार, गाजर, ढोबळी मिरचीच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील घाऊक बाजारात रविवारी (२२ सप्टेंबर) राज्य, तसेच परराज्यातून मिळून ९० ते १०० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक किंचित वाढली.पुणे विभागातून सातारी आले ४०० ते ५०० गोणी, भेंडी ७ ते ८ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो ७ ते ८ हजार पेटी, हिरवी मिरची ३ ते ४ टेम्पो,



ढोबळी मिरची ७ ते ८ टेम्पो, पुरंदर, पारनेर, वाई, सातारा परिसरातून मटार १०० गोणी, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, फ्लॉवर ७ ते ८ टेम्पो, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ७० ते ८० ट्रक, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून ४० टेम्पो बटाट्याची आवक झाली. महिनाभरापासून कोथिंबिर, मेथीसह सर्व पालेभाज्यांचे दर तेजीत होते. कोथिंबिर, मेथीची आवक वाढल्याने दरात घट झाली. शेपू, कांदापात, करडई, पुदिना, राजगिरा, चुका, चवळईचे दर स्थिर आहेत. मार्केट यार्डातील तरकारी विभागात कोथिंबिर दीड लाख जुडी, तसेच मेथीच्या ४० हजार जुडींची आवक झाली. गेल्या आठवड्यात किरकोळ बाजारात कोथिंबिरेच्या एका जुडीचे दर ५० ते ७० रुपये होते.

### शेकड्याचे दर पुढीलप्रमाणे

कोथिंबीर- १००० ते २०००, मेथी – १५०० ते २०००, शेपू – ८०० ते १५००, कांदापात- १२०० ते २०००, चाकवत – ५०० ते ८००, करडई- ५०० ते ८००, पुदिना – ५०० ते १०००, अंबाडी – ५०० ते ७००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा- ४०० ते ८००, चुका – ६०० ते १०००, चवळई- ५००-८००, पालक- १२००-१५००.गणेशोत्सवानंतर फळांच्या मागणीत घट झाली. सर्व फळांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. ६० टन, पपई ८ ते १० टेम्पो, लिंबे एक हजार ते दीड हजार गोणी, कलिंगड ५ ते ६ टेम्पो, खरबूज २ ते ३ टेम्पो, चिकू एक हजार खोकी, पेरू ७०० ते ८०० प्लास्टिक जाळी (क्रेट), सीताफळ २० ते ३० टन अशी आवक झाली.

## पिंपरीचे आमदार आण्णा बनसोडे "ऑन फायर मोड"; पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभेवर

# राष्ट्रवादीने केला दावा!

### मध्यवर्ती कार्यालयात बहुमताने ठराव पारित, अजित पवारांकडे मागणी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी : राष्ट्रवादीचा आमदार असलेल्या पिंपरी मतदारसंघावर शिवसेना आणि भाजपने दावा केल्यानंतर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीनेही शहरातील पिंपरीसह भोसरी आणि चिंचवड या तिन्ही मतदारसंघावर दावा ठोकला आहे. पक्षाच्या रविवारी (२२ सप्टेंबर) झालेल्या मासिक बैठकीमध्ये याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला.**



राष्ट्रवादीचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली शहर कार्यकारिणीची मासिक बैठक खराळवाडी येथील मध्यवर्ती पक्ष कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. बैठकीस ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर मंगला कदम, शहर कार्याध्यक्ष फजल शेख पक्षाचे माजी नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते. पिंपरी विधानसभा हा राष्ट्रवादीचा मतदारसंघ आहे. तो पक्षाच्या वतीने महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच लढणार आहे. त्याव्यतिरिक्त भोसरी व चिंचवड विधानसभेमध्ये देखील राष्ट्रवादी पक्षाची फार मोठी ताकद आहे. त्यामुळे चिंचवड व भोसरी विधानसभा हे दोन्ही मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मिळावेत, असा ठराव शहर कार्याध्यक्ष फजल शेख यांनी मांडला. त्या ठरावाला महिला अध्यक्षा कविता आल्हाट यांनी अनुमोदन दिले. या ठरावामुळे निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच महायुतीत कलगीतुरा रंगला आहे.

#### तीनही मतदारसंघावर दावा

पिंपरी मतदारसंघात राष्ट्रवादीचे अण्णा बनसोडे आमदार आहेत. तर, भोसरीत भाजपचे महेश लांडगे आणि चिंचवड मतदारसंघात भाजपच्या अश्विनी चिंचवडे या आमदार आहेत. महायुतीत 'ज्या पक्षाचा आमदार, त्या पक्षाला जागा', असे सूत्र ठरल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे विद्यमान आमदार असलेल्या पक्षाकडे मतदारसंघ कायम राहतील असे मानले जात होते. मात्र, शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पिंपरीवर दावा सांगितल्याने महायुतीत मिठाचा खडा पडला. भाजपनेही पिंपरी विधानसभा मतदारसंघावर दावा केला. शिवसेना आणि भाजपने पिंपरी मतदारसंघावर दावा केल्याने आमदार बनसोडे यांना उमेदवारी मिळविण्यासाठी संघर्ष करावा लागणार असल्याचे दिसते. त्यामुळेच आता राष्ट्रवादीनेही पिंपरीसह भोसरी आणि चिंचवड या तीनही मतदारसंघावर दावा ठोकला आहे.

---

## गोशाळांना सरसकट अनुदान, गोवंश संवर्धनासाठी शेतकऱ्यांना निधी!

### राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरक्षकांना दिला आश्वासन

#### डॉ. मिलिंद एकबोटे यांचे उपोषण स्थगित, आमदार महेश लांडगे यांची शिष्टाई

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून धोरणात्मक निर्णय घेऊन गोशाळांना अनुदान देण्यात येईल. तसेच, शेतकऱ्यांना गोवंश संवर्धनासाठी निधी देण्यात येईल, असे आश्वासन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.**



श्रीक्षेत्र आळंदी येथे इंद्रायणी घाटावर प्रखर हिंदूत्ववादी नेते तथा गोरक्षक डॉ. मिलिंद एकबोटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशी गोवंश संरक्षणासाठी देशी गोवंश बचाव जनआंदोलन व उपोषण सुरू केले होते. या उपोषणाला भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भेट दिली. यावेळी आमदार लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी याबाबत मोबाइलद्वारे संपर्क साधला. यावेळी तो प्रश्न मार्गी लावू असे आश्वासन उपुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहे.

राज्य सरकार, केंद्र सरकारकडे गोवंश संरक्षणासाठी एकत्रितपणे पाठपुरावा करू, अशी विनंती आमदार महेश लांडगे यांनी डॉ. मिलिंद एकबोटे यांना केली. उपमख्यमंत्री यांनी दिलेल्या शब्दामुळे व कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मिलिंद एकबोटे यांनी तिसऱ्या दिवशी उपोषण स्थगित केले आहे.

डॉ. मिलिंद एकबोटे म्हणाले की, देशी गोवंश संरक्षणासाठी निर्णय होईल असा 'शब्द' मला देण्यात आला आहे. महेशदादांच्या शब्दावर विश्वास ठेवतो. आठ दिवसांत तशी हालचाल व निर्णयात्मक प्रक्रिया सुरू झाली नाही, तर पुन्हा येथे उपोषणास बसणार आहे.

देशी गोवंश पाळणारे जे लोक आहेत, शेतकरी आहेत व शेतकऱ्यांबरोबर जे अन्य लोक आहेत त्यांचे प्रश्न महत्वाचे आहेत कारण आपल्या गोवंशाची काळजी आपणच घेऊ शकतो आणि त्याबाबतीत सरकारकडून सहकार्य व सवलती मिळणे अपेक्षित आहे.

> राज्यात खिल्लार गाई व खिल्लार बैल आहेत. हे सोन आपल्याकडे आहे. त्या सोन्याची जपणूक करणे संभाळ करणे सोन वाढवण्याचा प्रयत्न करणे. यासाठी आपण एकत्र आलो आहोत. माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मला सांगितले की, "महेश लांडगे यांच्या समक्ष ज्या गोशाळा आहेत. त्या सर्व गोशाळांना सरसकट व गोवंशाला अनुदान देण्याचा संबंधित निर्णय घेऊ." त्यामुळे आम्ही उपोषण स्थगित करीत आहोत. मात्र, प्रश्न मार्गी न लागल्यास पुन्हा आंदोलन करणार आहे.
> **–डॉ. मिलिंद एकबोटे,** गोरक्षक.

> राज्यातील शेतकऱ्यांकडे देशी गोवंश आहे त्यांना अनुदान देण्याचा विचार झाला पाहिजे. नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी चिंतेत असतात. गाई व बैल सांभाळ करण्यासाठी त्यांना कसरत करावी लागते. त्यांना सहकार्य मिळणे सर्वात महत्वाचे आहे. निवडणूक आचारसंहितेपूर्वी तुमचा निर्णय करतो. त्याबाबत तांत्रिक बाबींचा विचार करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहे.
> **– महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




## भूमिका

# सत्तालाभाचेही उपवर्गीकरण व्हावे!

**उपवर्गीकरणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयावरून गेले काही दिवस देशभर घुसळण सुरू आहे. उपवर्गीकरण याच मुद्द्याचा नेहमीच्या परिघाबाहेर जाऊन थोडा वेगळा विचार कसा करता येऊ शकतो यासंबंधी चर्चा**

सर्वोच्च न्यायालयाच्या उपवर्गीकरणासंबंधीच्या निकालाने देशभर आरक्षण या विषयावर पुन्हा एकदा नव्याने चर्चा-वाद सुरू झाला आहे. या निकालाचे जेवढे समर्थन केले जात आहे, त्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर त्याला विरोध होत आहे. अनुसूचित जातींच्या काही राजकीय व सामाजिक संघटनांनी या निकालाच्या विरोधात भारत बंद पुकारून त्यांची पहिली प्रतिक्रिया दिली. आरक्षणाच्या लाभासाठी अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात प्रामुख्याने दोन मुद्दे किंवा आक्षेप पुढे केले जात आहेत. एक अनुसूचित जातींमध्ये वर्गीकरण केले तर मागासवर्गीयांमध्येच जातीसंघर्ष सुरू होईल. दुसरे असे की, काही राजकीय पक्ष या निकालाचा फायदा घेऊन आपली जातीची मतपेढी तयार करण्याचा किंवा जातीय ध्रुवीकरणाचा प्रयत्न करतील, त्यातूनही पुन्हा जाती संघर्षच उभा राहण्याचा धोका आहे.सर्वोच्च न्यायालयाच्या उपवर्गीकरणाविषयीच्या निकालाबाबत मतमतांतरे असली



तरी, आरक्षण धोरणाची समीक्षा-चिकित्सा व्हायलाच नको, अशी भूमिका सामाजिक न्याय तत्त्वाला धरून होणार नाही. धोरण कोणतेही असो, ५० वर्षांहून अधिक काळ ते जसे आहे तसेच चालू ठेवले तर, त्याचा मूळ हेतू किंवा उद्देशच मारला जाण्याचा आणि त्यावर एका ठरावीक वर्गाचीच मक्तेदारी निर्माण होण्याचा धोका असतो. मग ते आरक्षण असो की समाज जीवनावर बरे-वाईट परिणाम करणारी अन्य कोणतीही धोरणे असोत. या अर्थाने सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाच्या निमित्ताने उपवर्गीकरणाच्या थोडे परिघाबाहेर जाऊन चर्चा-मंथन करण्याची आवश्यकता आहे. प्रथम आरक्षणाविषयी. सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण कसे करावे, याबाबत दोन प्रारूपे समोर ठेवून राज्यांना दिशादिग्दर्शन केले आहे. त्याचा सारांश असा आहे की, अनुसूचित जातींचे अति सामाजिक मागास आणि मागास असे उपवर्गीकरण करावे आणि अनुसूचित जातींसाठी आरक्षित असलेल्या जागांवर अति सामाजिक मागास जातींना प्राधान्य देण्यात यावे किंवा अति सामाजिक मागास जातींना ठरावीक टक्के वेगळे आरक्षण द्यावे. अर्थात हे वेगळे आरक्षण सध्याच्या टक्क्यांमधूनच द्यावे, म्हणजे उदाहरणार्थ महाराष्ट्रात १३ टक्क्यांतून व केंद्रात १५ टक्क्यांतून देणे. याचा दुसरा साधा-सोपा अर्थ असा की, काही जातींना आरक्षणांतर्गत आरक्षण किंवा कोटाअंतर्गत कोटा, अशी नवी व्यवस्था निर्माण करणे, ज्यामुळे अति सामाजिक मागास जातींना आरक्षणाचा योग्य लाभ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या प्रारूपाचा विचार करता, आरक्षणाचा लाभ मिळालेल्या काही जाती प्रगत झाल्या व लाभ न मिळालेल्या जाती अवनत राहिल्या, हा उपवर्गीकरणाचा पाया असेल तर, त्यात जाती संघर्षाचा तर धोका आहेच, परंतु त्यात न्याय तत्त्वाचा अवलंब होतो का, याचाही विचार करावा लागेल. उदाहरणार्थ आरक्षणाचा लाभ एखाद्या जातीला १५ टक्के झाला असेल, दुसऱ्या एका जातीला २० टक्के झाला असेल, एखाद्या जातीला ५० टक्के झाला असेल, असे गृहीत धरले तरीही ती संपूर्ण जात प्रगत झाली आहे किंवा एखादी जात पूर्णपणे अतिमागास राहिलेली आहे, असा निष्कर्ष काढता येऊ शकत नाही. सर्वच अनुसूचित जातींधील काही लोक कमी-अधिक प्रमाणात आर्थिकदृष्ट्या प्रगत झाले आहेत, हे सत्य आहे आणि सर्वच जातींमधील अनेक लोक अजूनही मागासलेलेच राहिलेले आहेत हे वास्तव आहे. त्यामुळे जात हा पाया मानून उपवर्गीकरण केले तर, सर्वच अनुसूचित जातींमधील आरक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकांवर अन्याय होऊ शकतो. प्रश्न अन्याय निवारणाचा असेल तर, त्याची सोडवणूक करणारा उपाय न्याय तत्त्वाशी सुसंगत असावा, विसंगत असू नये, अशी माफक अपेक्षा करायला हरकत नाही. समाजातील वंचित-उपेक्षित घटकाला आरक्षणाच्या माध्यमातून न्याय द्यायचा असेल तर, फेरमांडणी करण्याची आवश्यकता आहे.

## प्रासंगिक »

# यांनी करून टाकले!

***एकाच वेळी निवडणुका घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यामागचा सरकारचा खरा हेतू त्या समितीला या कामासाठी ज्या चौकटी आखून दिल्या आहेत.***

समितीला घातलेली पहिलीच अट अशी होती की समितीने ‘एकाच वेळी निवडणुका घेण्याबाबत तपासणी करून शिफारशी द्याव्यात...’ म्हणजेच समितीला दिला गेलेला अलिखित आदेश असा होता की, देशातील २८ राज्यांमध्ये लोकसभा आणि विधानसभेसह केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणुका एकाच वेळी घेणे व्यवहार्य आणि शक्य आहे, अशी या समितीने शिफारस करावी.त्यामुळे समितीने तिला दिला गेलेला आदेश निष्ठेने पार पाडला, असे म्हणता येईल. या समितीची रचना पाहिली की त्यात कोणाही तज्ज्ञांचा समावेश नव्हता हे लगेचच लक्षात येते. समितीच्या अध्यक्षांसह आठ सदस्यांमध्ये केवळ एक घटनातज्ज्ञ होता. आणखी एक सदस्य संसदीय कार्यपद्धतीमध्ये पारंगत होता, परंतु त्याचा कायद्याचा तेवढा सराव नव्हता किंवा त्याने कायदा कधी शिकवला नव्हता. दोघे राजकारणी होते.

स्वातंत्र्याची पाऊणशे वर्षे उलटून गेल्यानंतरही भटक्या विमुक्त जमातींचे दैन्य संपलेले नाही. समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी त्यांना अजून बराच काळ लागणार आहे. अठरा विशे दारिद्र्याच्या जोडीला रोजगाराच्या अभावाचा, रोजगाराच्या अपुरेपणाचा, व्यसनाधीनतेचा शाप... त्यामुळे दारिद्र्याची भीषणता अधिक भेसूर झाल्याचे दिसते.

# भटक्या जमातींना रस्ता शोधून देण्यासाठी धडपड

समाजातील या घटकाच्या उत्थानासाठी सरकारी उपाययोजना पुरेशा नसताना काही सामाजिक संस्था, कार्यकर्ते त्यासाठी धडपड करताना दिसतात. ‘भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान’ त्यापैकीच एक महत्त्वाची संस्था आहे. सध्या ही संस्था ५४ पालांवर शाळा चालवते. त्यांना सढळ आर्थिक मदतीची गरज आहे.देशातील प्रमुख प्रगतशील राज्य अशी आपल्या महाराष्ट्राची ओळख... प्रबोधनाची उज्ज्वल परंपरा सांगणारा, विवेकाची कास धरल्याचा अभिमान बाळगणारा हा प्रदेश... तरीही वेशीबाहेरील वस्तीचे दु:ख पूर्णपणे दूर करण्यात यश मिळाले नाही. मात्र, त्या ध्येयाच्या दिशेने अविरत चालणारी पावले आपल्याला दिसतात. वैयक्तिक, भौतिक सुखाचा विचार न करता वंचित समूहाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांचा हरपलेला सन्मान परत मिळवून देण्यासाठी काम करणारे हजारो हात राज्यभर विखुरलेले पाहायला मिळतात. वर्धा



जिल्ह्यातील रोठा या गावातील ‘उमेद’ ही संस्थाही त्याच साखळीतील मोलाचा दुवा आहे.देशाला स्वतंत्र करण्यासाठी समाजाला संघटित करण्याच्या उद्देशातून एकोणिसाव्या शतकात गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांनी स्थापन केलेली, स्वराज्याचे रूपांतर सुराज्यात करण्यासाठी झटणारी, एकविसाव्या आव्हानांना समर्थपणे तोंड देणारी, तीन शतकांचा दुवा सांधणारी ‘पुणे सार्वजनिक सभा’ ही संस्था नव्या वास्तूसह अनमोल दस्तावेजांचे डिजिटीकरणाच्या माध्यमातून जतन करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्यासाठी आर्थिक साहाय्याची गरज आहे...जैवविविधतेच्या दृष्टीने जागतिक पातळीवर संवेदनशील मानल्या गेलेल्या पश्चिम घाटाचा कोकण हा महत्त्वाचा हिस्सा आहे. बिबटे, अस्वले, रानडुकरे, कोल्हे, तसेच विविध प्रकारच्या पक्षी आणि फुलपाखरांमुळे या प्रदेशाला कमालीची नैसर्गिक विविधता प्राप्त झाली आहे. पण ही नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होण्याचे संकट जगाच्या अन्य भागाप्रमाणे कोकणातही उभे ठाकले आहे. मात्र त्यापुढे हार न मानता रत्नागिरी जिल्ह्यातील देवरुख येथील ‘सह्याद्री संकल्प सोसायटी’चे कार्यकर्ते गेली सुमारे दोन दशके या क्षेत्रात व विविध आघाड्यांवर झपाटून काम करत आहेत. त्याचा आगामी पिढ्यांना चांगलाच फायदा होणार आहे.राज्यात, विशेषत: मराठवाड्यात शेतकरी आत्महत्या हा न सुटलेला प्रश्न आहे. अशा आणि आर्थिक संकटांमध्ये सापडलेल्या इतर घरांमधील मुलांच्या मदतीसाठी संत गाडगेबाबा स्वयंसेवी संस्थेच्या संतोष पवार यांनी आधार माणुसकीचा हा उपक्रम आखला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# चिथावणीखोर भाषणांना सरकारचं अभय?

## न्यायालयाला दिलेल्या आश्वासनानंतरही गृहखातं निवांत

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात सकल हिंदू समाजाकडून राज्यभरात मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यातील भाषणात नेत्यांनी केलेल्या चिथावणीखोर विधानांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेला उत्तर देताना आम्ही या भाषणांविरोधात कारवाई करत असल्याचे राज्य सरकारने न्यायालयात सांगितलं होतं. मात्र, राज्य सरकारला आता सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्याचं कारण म्हणजे एक वर्ष उलटूनही राज्य सरकारने अशा प्रकरणात गुन्हा दाखल करण्याव्यतिरिक्त पुढे कोणतीही कारवाई केली नसल्याने माहितीच्या अधिकारातून उघड झालं आहे.**



'द इंडियन एक्सप्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयात आश्वासन दिल्यानंतरही राज्य सरकारने चिथावणीखोर भाषणांविरोधात गुन्हे दाखल करण्याव्यतिरिक्त पुढे कोणतीही कारवाई केलेली नाही. जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान चिथावणीखोर भाषणांची एकूण २५ प्रकरणं दाखल करण्यात आली होती. मात्र, यापैकी १९ प्रकरणांत अद्यापही आरोपपत्र दाखल करण्यात आलेलं नाही. यापैकी १६ प्रकरणं ही सकल हिंदू समाजाच्या नेत्यांशी संबंधित होती. "ही प्रकरणी संवेदनशील असून खटला चालवण्यासाठी राज्य सरकारच्या मंजुरी आवश्यकता आहे. त्यामुळे आरोपपत्र दाखल करण्यात आलेली नाही", असं माहितीच्या अधिकारात सांगण्यात आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे या १९ पैकी ८ प्रकरणं ही राजकीय नेत्याच्य विरोधात आहेत.या १९ प्रकरणाशिवाय उर्वरित ६ प्रकरणांपैकी ३ प्रकरणांत आरोपपत्र दाखल करण्यात आले होते. कारण त्याला सरकारच्या मंजुरीची आवश्यकता नव्हती. यापैकी २ प्रकरणं ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या विधानांशी संबंधित होती. तर एक प्रकरण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना करण्यासंदर्भात होते.यासंदर्भात 'द इंडिन एक्सप्रेस'ने राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क केला असता, कायद्यानुसार करावाई सुरू आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच गृहविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता, "अशी प्रकरणं संवेदनशील असल्याने आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी राज्य सरकारची मंजुरी आवश्यक असते. या सर्व प्रक्रियेला सहा ते आठ महिने लागू शकतात", असं ते म्हणाले. तसेच "अनेक प्रकरणांमध्ये, पोलिस अधिकारी योग्य कागदपत्रे जोडत नाहीत म्हणून आम्हाला ती परत पाठवावी लागतात, त्यामुळे उशीर होतो", असेही त्यांनी सांगितलं. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात सकल हिंदू समाजाकडून राज्यभरात मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यातील भाषणात नेत्यांनी केलेल्या चिथावणीखोर विधानांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेला उत्तर देताना आम्ही या भाषणांविरोधात कारवाई करत असल्याचे राज्य सरकारने न्यायालयात सांगितलं होतं. मात्र, राज्य सरकारला आता सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या आश्वासनाचा विसर पडला की काय? अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. त्याचं कारण म्हणजे एक वर्ष उलटूनही राज्य सरकारने अशा प्रकरणात गुन्हा दाखल करण्याव्यतिरिक्त पुढे कोणतीही कारवाई केली नसल्याने माहितीच्या अधिकारातून उघड झालं आहे.

'द इंडियन एक्सप्रेस'ने दिलेल्या वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयात आश्वासन दिल्यानंतरही राज्य सरकारने चिथावणीखोर भाषणांविरोधात गुन्हे दाखल करण्याव्यतिरिक्त पुढे कोणतीही कारवाई केलेली नाही. जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान चिथावणीखोर भाषणांची एकूण २५ प्रकरणं दाखल करण्यात आली होती. मात्र, यापैकी १९ प्रकरणांत अद्यापही आरोपपत्र दाखल करण्यात आलेलं नाही. जानेवारी ते एप्रिल २०२३ दरम्यान चिथावणीखोर भाषणांची एकूण २५ प्रकरणं दाखल करण्यात आली होती. मात्र, यापैकी १९ प्रकरणांत अद्यापही आरोपपत्र दाखल करण्यात आलेलं नाही. यापैकी १६ प्रकरणं ही सकल हिंदू समाजाच्या नेत्यांशी संबंधित होती. त्यामुळे आरोपत्र दाखल करण्यात आलेली नाही", असं माहितीच्या अधिकारात सांगण्यात आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे या १९ पैकी ८ प्रकरणं ही राजकीय नेत्याच्य विरोधात आहेत.

### राज्य सरकारची मंजुरी आवश्यक

कारण त्याला सरकारच्या मंजुरीची आवश्यकता नव्हती. यापैकी २ प्रकरणं ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविरोधात केलेल्या विधानांशी संबंधित होती. तर एक प्रकरण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची विटंबना करण्यासंदर्भात होते.यासंदर्भात 'द इंडिन एक्सप्रेस'ने राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क केला असता, कायद्यानुसार करावाई सुरू आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. तसेच गृहविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क केला असता, "अशी प्रकरणं संवेदनशील असल्याने आरोपपत्र दाखल करण्यापूर्वी राज्य सरकारची मंजुरी आवश्यक असते.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना ही शेवटची संधी

## आरक्षणाच्या मुद्द्यावरून जरांगे पाटलांचा थेट इशारा!

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजकारणात जायचं नाही म्हणून मी उपोषणाला बसलो असून मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी देवेंद्र फडणवीसांना ही शेवटची संधी आहे. त्यानंतर त्यांना आरक्षणाच्या विषयावर तोंडही उघडता येणार नाही, असा इशारा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. तसेच राज्यात मराठ्यांवर अन्याय सुरू असून सरकारकडून हे सगळं ठरवून हे केलं जातं आहे, असा आरोपही त्यांनी केला.**

मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे सध्या आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. आज सकाळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केलं. तसेच त्यांनी वडीगोद्री येथे झालेल्या मराठा-ओबीसी संघर्षाबाबतही प्रतिक्रिया दिली. राज्यात मराठ्यांवर अन्याय सुरू आहे. सरकारकडून ठरवून हे सगळं केलं जातं आहे. त्यामुळे मराठा समाजातील तरुण रस्त्यावर उतरले आहेत. मी फक्त राजकारण ज्यायचं नाही म्हणून उपोषणाला बसलो आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण





देण्याची देवेंद्र फडणवीस यांना ही शेवटची संधी आहे. त्यानंतर त्यांना आरक्षणाच्या मुद्द्यावर तोंड उघडता येणार नाही. आरक्षण मिळालं नाही, तर त्यांना देवेंद्र फडणवीस दोषी असतील, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली. तसेच एक दोन दिवसांत आरक्षणाचा निर्णय होईल", अशी अपेक्षा आहे, असेही ते म्हणाले.पुढे बोलताना त्यांनी काल वडीगोद्री येथे झालेल्या ओबीसी-मराठा संघर्षावरही भाष्य केलं. "मी मराठ्यांना शांत राहण्याचे आवाहन करतो आहे. पण या वादाला तुम्ही ओबीसी-मराठा असं नाव देऊ नका. ओबीसी आणि मराठा कधीच एकमेकांच्या अंगावर जात नाही. हे काही लोकांनी जाणीवपूर्वक केलेलं नाटक आहे. त्यांना ओबीसीसाठी लढायचं नाही. हे लोकं फक्त भाडणं करण्यासाठी लढत आहेत.

### नेत्यांनी थयथयाट केला असता

ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या उपोषणामुळे वडीगोद्रीतून आतरवाली सराटीकडे जाणारा रस्त्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. यावरून मनोज जरांगे यांनी सरकारवर टीका केली. "मराठे जातीयवादी आहेत, असं आरोप अनेकदा आमच्यावर केला जातो. मात्र, वडीगोद्री येतील आंदोलनामुळे आंतरवाली सराटीत येणारे रस्ते सरकारने बंद केले आहेत. मराठ्यांना दुसऱ्या रस्त्यावरून जाण्यास सांगितलं जात आहे. पण हेच आम्ही केलं असतं तर ओसीबींना वाडीत टाकलं, अशी टीका आमच्यावर करण्यात आली असती. छगन भुजबळसारखे नेत्यांनी थयथयाट केला असता.

# माझी फसवणूक झाल्यासारखं वाटतं!

## आंध्रचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण ११ दिवसांचा उपवास करणार

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आंध्रप्रदेशमधील तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खबळबळ उडाली. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केले जात असून आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहे. त्यातच आता आंध्रचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांनी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. मी प्रसादाच्या लाडूमधील भेसळ रोखू शकलो नाही, त्यामुळे मला आतून फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करून प्रायश्चित करत आहे, अशी पोस्ट पवन कल्याण यांनी एक्सवर टाकली आहे.**





उपमुख्यमंत्री पवन कल्याण आता गुंटूर जिल्ह्यातील नंबूर येथील श्री दशावतार वेंकटेश्वर स्वामी मंदिरात २२ सप्टेंबर पासून ११ दिवसांची प्रायश्चित दीक्षा घेणार आहेत. तिरुपती मंदिरातील लाडूमध्ये जनावरांची चरबी आढळल्यामुळे अतीव दुःख झाले. मागच्या सरकारच्या काळात ही घटना घडली असली, तरी मला माझीच फसवणूक झाल्याचे वाटते, त्यामुळे मी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला असल्याचे ते म्हणाले. आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये त्यांनी म्हटले, "आपली संस्कृती, आस्था, विश्वास आणि श्रद्धा यांचा सन्मान करणारी आहे. श्री तिरुपती बालाजी देवस्थानाच्या प्रसादात भेसळ करून जी अपवित्रता पसरविण्याचा प्रयत्न केला गेला, त्याबद्दल मला मनापासून दुःख वाटतेय. खरे सांगायाचे तर मला माझीच फसवणूक झाली असे वाटतेय. त्यामुळे प्रभू वेंकटेश्वरकडे मी प्रार्थना करतो की, त्याची कृपादृष्टी आमच्यावर आणि सर्व सनातन्यांवर कायम राहू दे."पवन कल्याण पुढे म्हणाले, मी या क्षणापासून आता देवासमोर प्रायश्चित करून माफी मागत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करण्याचा धर्म संकल्प सोडत आहे. उपवासाच्या शेवटच्या दिवशी १ किंवा २ ऑक्टोबर रोजी मी स्वतः तिरुपती बालाजीच्या मंदिरात जाऊन दर्शन घेत आणि देवाची माफी मागणार आहे.दरम्यान पवन कल्याण यांनी संपूर्ण भारतातील मंदिरांशी संबंधित सर्व समस्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर 'सनातन धर्म संरक्षण मंडळ' स्थापन करण्याची मागणीही केली आहे. "सनातन धर्माचा कोणत्याही स्वरूपात होणारा अपमान थांबवण्यासाठी आपण सर्वांनी त्वरित एकत्र आले पाहिजे", असे आवाहन त्यांनी केले होते.आंध्रप्रदेशमधील तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खबळबळ उडाली. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केले जात असून आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहे. त्यातच आता आंध्रचे उपमुख्यमंत्री आणि अभिनेते पवन कल्याण यांनी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला आहे. मी प्रसादाच्या लाडूमधील भेसळ रोखू शकलो नाही, त्यामुळे मला आतून फसवणूक झाल्यासारखे वाटत आहे. यासाठी मी ११ दिवसांचा उपवास करून प्रायश्चित करत आहे, अशी पोस्ट पवन कल्याण यांनी एक्सवर टाकली आहे. उपमुख्यमंत्री पवन कल्याण आता गुंटूर जिल्ह्यातील नंबूर येथील श्री दशावतार वेंकटेश्वर स्वामी मंदिरात २२ सप्टेंबर पासून ११ दिवसांची प्रायश्चित दीक्षा घेणार आहेत. सरकारच्या काळात ही घटना घडली असली, तरी मला माझीच फसवणूक झाल्याचे वाटते, त्यामुळे मी प्रायश्चित करण्याचा निर्णय घेतला.

### आंध्रप्रदेशचे राजकारण तापले

श्री तिरुपती बालाजी देवस्थानाच्या प्रसादात भेसळ करून जी अपवित्रता पसरविण्याचा प्रयत्न केला गेला, त्याबद्दल मला मनापासून दुःख वाटतेय. खरे सांगायाचे तर मला माझीच फसवणूक झाली असे वाटतेय. त्यामुळे प्रभू वेंकटेश्वरकडे मी प्रार्थना करतो की, त्याची कृपादृष्टी आमच्यावर आणि सर्व सनातन्यांवर कायम राहू दे."पवन कल्याण पुढे म्हणाले, आंध्रप्रदेशमधील तिरुपतीस्थित श्री वेंकटेश्वर मंदिरामध्ये प्रसाद म्हणून वाटप केल्या जाणाऱ्या लाडवांच्या नमुन्यामध्ये निम्न दर्जाचे तूप आणि प्राण्यांची चरबी आढळल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर एकच खबळबळ उडाली. या प्रकरणी माजी मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केले जात असून आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहे.

# मुलगा आईलाच डोळे दाखवायला लागला

## भागवत यांना प्रश्न विचारत केजरीवाल यांची मोदींवर टीका

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर आज दिल्लीच्या जंतर मंतर मैदानावर पक्षातर्फे 'जनता की अदालत' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर हल्लाबोल करत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना पाच प्रश्न विचारले आहेत.**



अरविंद केजरीवाल म्हणाले, मी मोहन भागवत यांचा आदर राखून त्यांना पाच प्रश्न विचारू इच्छितो. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरात पक्ष फोडत आहेत, जेपी नड्डा म्हणतात त्यांना आता संघाची गरज उरलेली नाही.भाजपासाठी संघ आईसमान आहे, पण आता मुलगा इतका मोठा झालाय की, आईकडेच डोळे वटारून पाहू लागला आहे, अशी टीका अरविंद केजरीवाल यांनी केली.लोकशाहीसाठी घातक राजकारण – पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय यंत्रणाचा दुरुपयोग करून विरोधी पक्षातील नेत्यांवर दहशत बसवत आहेत. विरोधकांचे सरकार पाडत आहेत. हे लोकशाहीसाठी योग्य आहे का? मोहन भागवत यांना ही लोकशाहीसाठी धोक्याची घंटा असल्याचे वाटत नाही का? भ्रष्ट नेत्यांना भाजपात प्रवेश – पंतप्रधान मोदी आणि भाजपाने देशातील भ्रष्ट नेत्यांना आपल्या पक्षात सामील करून घेतले.

### जेपी नड्डा यांच्या विधानावर आक्षेप

रविंद केजरीवाल यांनी तिसऱ्या प्रश्नात विचारले की, संघाने भाजपाला जन्म दिला. संघ भाजपाची जननी आहे. त्यामुळे भाजपाने योग्य मार्गक्रमण करावे, ही संघाची जबाबदारी आहे. "तुम्ही कधी नरेंद्र मोदी यांना ते चुकीच्या मार्गावर चालले आहेत, याबद्दल टोकले का? तुम्ही भाजपाच्या कार्यशैलीवर समाधानी आहात का?", असा सवाल मोहन भागवत यांना केजरीवालांनी विचारला. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी भाजपाला आता संघाची गरज उरली नाही, असे विधान केले होते. या विधानानंतर भाजपाची जननी असलेल्या संघाला दुःख वाटले नाही का?

# रणबीर कपूर लेक राहासाठी गातो चक्क मल्याळम अंगाई

अभिनेत्री आलिया भट्ट सध्या 'जिगरा' सिनेमाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. एक वर्षानंतर आलियाचा सिनेमा येत असून, ती नुकतीच या सिनेमाच्या प्रमोशनसाठी 'द ग्रेट इंडियन कपिल शो'मध्ये आली होती. या कार्यक्रमाचा दुसरा सीझन आला आहे आणि पहिल्याच एपिसोडमध्ये कपिलने 'जिगरा'च्या टीमचे स्वागत केले. आलियासह करण जोहर, वेदांग रैना व चित्रपटाचे दिग्दर्शक वासन बाला हे या कार्यक्रमात उपस्थित होते. या भागात मातृत्व, सेलिब्रिटींनी पालक झाल्यानंतर त्यांच्यात होणारे बदल यांवर चर्चा झाली. आलिया भट्टने रणबीर, राहा आणि त्यांच्या नात्यावर, तसेच ते करीत असलेल्या मजेशीर खेळांवर भाष्य केले.आलिया सांगते, "रणबीर राहासाठी अनेक वेगवेगळे खेळ शोधून काढतो. अचानक तो राहाला विचारतो, 'तुला कपाटातले कपडे हाताळायचे आहेत का?' आणि मग ते दोघं एकत्र खेळतात. कपड्यांचं वर्गीकरण करताना ते 'वेल्वेट', 'सुएड', 'कॉटन' अशी मजेशीर नावं देतात. रणबीर खूप क्रिएटिव्ह आहे. हे पाहून मन खूप प्रसन्न होतं."आलियाने सांगितले, "राहाची देखभाल करणाऱ्या नर्स केरळमधील आहेत आणि त्या राहाला झोपवताना एक मल्याळम गाणे अंगाई म्हणून गातात. हे गाणं १९९१ पासून मल्याळी



कुटुंबांमध्ये मुलांना झोपवण्यासाठी लोकप्रिय आहे. हे गाणं १९९१ च्या मल्याळम चित्रपट 'संध्वानम'मधील आहे." आलियाने पुढे सांगितले, "राहाला झोपायचं असेल तेव्हा ती 'वावावो' असं म्हणते आणि आता रणबीरदेखील 'उन्नी वावावो' गाणं शिकला आहे." करण जोहरनेदेखील सांगितले की, मल्याळम भाषा शिकली आहेत.कपिल शर्मानि महेश भट्ट हे राहाचे आजोबा या भूमिकेत असताना कसे असतात, असा प्रश्न विचारला. त्यावर आलिया म्हणाली, "राहा त्यांना 'जीपाऽऽ' म्हणते आणि महेशजी त्यांच्या चेहऱ्यावरचे वेगवेगळे हावभाव करून राहाला हसवतात." आलियाने पुढे सांगितले, "हे पाहून खूप गोड वाटतं आणि असं वाटतं की, माझ्या बाबांनी मला लहानपणी असंच हसवलं असेल. जेव्हा आपण आपल्या पालकांना आपल्या मुलांशी खेळताना पाहतो, तेव्हा आपलं स्वतःचं बालपण डोळ्यांसमोर उभं राहतं."

## भारतीय अभिनेत्री पाकिस्तान दौऱ्यावर

७० च्या दशकातील दिग्गज अभिनेत्री मुमताज खूप लोकप्रिय आहेत. आता त्या चित्रपटांमध्ये काम करत नसल्या तरी सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत. त्या इन्स्टाग्रामवर त्यांचे फोटो व व्हिडीओ शेअर करत असतात. त्या अनेक विषयांवर आपली मतं मांडत असतात. मुमताज सध्या पाकिस्तानला गेल्या आहेत, तिथून त्यांनी काही फोटो व व्हिडीओ शेअर केले आहेत. मुमताज या व्हिडीओंमध्ये हाउस पार्टीचा आनंद लुटताना दिसत आहेत. त्यांनी शेअर केलेल्या पोस्टमध्ये अनेक पाकिस्तानी कलाकार दिसत आहेत. त्यांनी पाकिस्तानी गायक गुलाम अली यांच्याबरोबरचा एक फोटो शेअर केला आहे.दरम्यान, मुमताज काही दिवसांपूर्वी झीनत अमान यांच्यावर टीका केल्यामुळे चर्चेत होत्या. झीनत यांनी तरुणांना लग्नाआधी लिव्ह इनमध्ये राहण्याचा सल्ला दिला होता.

## आरुषीने गुपचूप लग्न उरकलं

'लव्ह आज कल २' फेम अभिनेत्री आरुषी शर्मानि गुपचूप लग्न उरकलं आहे. तिच्या लग्नाचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अभिनेत्रीने बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टरशी लग्नगाठ बांधली आहे. तिने अद्याप लग्नाचे फोटो सोशल मीडियावर शेअर केले नाही, पण तिच्या लग्नात हजर असलेल्या मंडळींनी काही फोटो पोस्ट केले आहेत. 'काला पानी' या वेब सीरिजमध्ये शेवटची दिसलेली आरुषी शर्मानि आयुष्यभरासाठी तिचा जोडीदार निवडला आहे. अभिनेत्रीने १८ एप्रिल रोजी हिमाचल प्रदेशमध्ये लग्नगाठ बांधली. तिने प्रसिद्ध कास्टिंग डायरेक्टर वैभव विशांतशी गुपचूप लग्न केलं. आरुषी आणि वैभवने अत्यंत खासगी सोहळ्यात सात फेरे घेतले. या लग्नाला फक्त त्यांचे कुटुंबीय आणि काही जवळचे मित्र उपस्थित होते.आरुषी शर्माच्या लग्नाचे फोटो खूप व्हायरल होत आहेत. ती पेस्टल रंगाचा लेहेंग्यामध्ये खूप सुंदर दिसत आहे. वैभवनेही खूप सुंदर अशी नक्षीदार शेरवानी घातली आहे.आत्तापर्यंत त्याने 'बडे मियाँ छोटे मियाँ', 'पीके', 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' आणि 'बदलापूर' सारख्या जवळपास ५० चित्रपटांसाठी कास्टिंगचं काम केलं आहे. विशेष म्हणजे वैभवने 'काला पानी' या वेब सीरिजसाठी कास्टिंग डायरेक्टर म्हणूनही काम पाहिलं होतं.



## राजकुमार रावने प्लास्टिक सर्जरी केली

आपल्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव दिलजीत दोसांझच्या कॉन्सर्टमध्ये दिसल्यापासून चर्चेत आहे. या कॉन्सर्टमध्ये अभिनेता नेहमीपेक्षा थोडा वेगळा दिसत होता. दरम्यान, या कॉन्सर्टमधील राजकुमारचे पापाराझींनी काढलेले फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आणि राजकुमारने प्लास्टिक सर्जरी केल्याच्या चर्चांना उधाण आलं. त्यावर आता राजकुमारनं मौन सोडलं आहे. नुकत्याच 'बॉलीवूड हंगामा'ला दिलेल्या मुलाखतीत राजकुमार राव म्हणाला, "मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केली नाही आहे. व्हायरल झालेला फोटो फक्त एक वाईट फोटो होता,असं आपण म्हणू शकतो. त्या फोटोला टच-अप्स केले आहेत. मला खूपदा वाटतं की, माझी त्वचा अशी नितळ आणि चमकदार असती, तर किती चांगलं झालं असतं. कारण- त्या फोटोत मी तसाच दिसत होतो. मी तेव्हा कोणताच मेकअप केला नव्हता; पण मलाही वाटलं की, तो फोटो खूप विचित्र दिसत होता. कॅमेऱ्यात कैद झालेला तो एक वाईट क्षण होता. मी कोणतीही प्लास्टिक सर्जरी केलेली नाही."आठ वर्षांअगोदर मी हनुवटीसाठी काही फिलर वर्क केलेलं. कारण- मला आत्मविश्वास असल्यासारख दिसायचं होतं. तेव्हा माझ्या त्वचाशास्त्रज्ञानं मला सल्ला दिला होता आणि मी त्याप्रमाणे केलं. त्यानंतर माझा आत्मविश्वास वाढला का? तर हो. त्यानंतर मी आणखी चांगले चित्रपट केले आहेत आणि त्यामुळे माझा दृष्टिकोन बदलला आहे. अभिनय हे दृश्य माध्यम आहे. माझा याला विरोध नाही. जर एखाद्याला त्याचा आत्मविश्वास वाढवायचा असेल आणि विज्ञान उपलब्ध असेल, तर कोणी ते का करणार नाही.

## गोविंदाची भाची आरती मंदिरात करणार लग्न



गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. अभिनेत्रीने सांगितलं की तिचं लग्न डेस्टिनेशन वेडिंग नसेल तर ती मंदिरात लग्न करणार आहे. आरती व दिपक यांचं अरेंज मॅरेज आहे. ते गेल्या वर्षी जुलैमध्ये भेटले होते, त्यानंतर एकत्र वेळ घालवल्यानंतर लग्न करण्याचा निर्णय घेतला. ती दिपक चौहानशी २५ एप्रिलला मुंबईतील इस्कॉन मंदिरात लग्न करणार आहे. "मी दागिने घालणार नाही किंवा लग्नाआधीचे कोणतेही कार्यक्रम नसतील, असं नाही. सर्व काही होईल. मी लूक कसा करायचा ते ठरवलंय आणि हेवी ज्वेलरी मी लग्नाच्या दिवशी घालेन. पण मला साधेपणा आवडतो, माझे लग्न इस्कॉन मंदिरात होणार आहे आणि माझी इच्छा जशी होती, तसंच सगळं घडत आहे," असं आरती म्हणाली.ती पुढे म्हणाली, "सुरुवातीला मला वाटलं की काशी विश्वनाथला जाऊन लग्न करावे, पण नंतर विचार केला की खूप नातेवाईक आहेत, इंडस्ट्रीतील मित्र आहेत. माझ्याइतकेच तेही माझे लग्नासाठी उत्साहित आहेत. माझे मित्र म्हणतायत की तू नाही बोलावलंस तरी आम्ही तुझ्या लग्नाला येऊ. अंकिता लोखंडे प्रत्येक कार्यक्रमात असणार आहे. प्रिंस नरुला ऑस्ट्रेलियाला गेला, पण युविका माझ्या लग्नासाठी थांबली. मी ही नाती कमावली आहेत आणि मी खूप आनंदी आहे."आरतीच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास तिने 'मायका', 'थोडा है बस थोडा की जरुरत है', 'परिचय', 'उत्तरन', 'उडान', 'ससुराल सिमर का' यासारख्या टीव्ही मालिका केल्या आहेत. आरती शेवटची 'श्रावणी' मालिकेत दिसली होती. याशिवाय ती बिग बॉस १३ मध्येही सहभागी झाली होती.गोविंदाची भाची व अभिनेत्री आरती सिंह लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.

# भारतीय क्रिकेट संघाने रचला इतिहास!

## पंतने लंचब्रेकनंतर दुसऱ्या डावात शतक झळकावले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय संघाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशचा तब्बल २८० धावांनी पराभव केला आहे. भारताने बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचे आव्हान दिले होते आणि २३४ धावांवर बांगलादेशला ऑल आऊट करत कसोटी मालिकेत १-० ने आघाडी मिळवली आहे. रविचंद्रन अश्विनच्या ६ विकेट्सच्या जोरावर भारताने दुसऱ्या डावात एकतर्फी दबाव आणला.**






भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने मोठ्या सहजतेने जिंकला. भारताच्या विजयात आर अश्विनची भूमिका महत्त्वाची होती. आर अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावत भारताचा डाव सावरला आणि दुसऱ्या डावात विक्रमी ६ विकेट्स घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने मोठ्या सहजतेने जिंकला. भारताच्या विजयात आर अश्विनची भूमिका महत्त्वाची होती. आर अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावत भारताचा डाव सावरला आणि दुसऱ्या डावात विक्रमी ६ विकेट्स घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.बांगलादेशला हरवून भारताने कसोटी क्रिकेटमध्ये मोठी कामगिरी केली आहे. भारतीय क्रिकेट संघाने १९३२ साली कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून भारताने एकूण ५८० सामने खेळले आहेत. ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच टीम इंडियाने पराभवापेक्षा जास्त विजयाचा आकडा गाठला आहे. बांगलादेशचा पराभव करून टीम इंडियाने कसोटी क्रिकेटमधील १७९वा विजय संपादन केला आहे. तर, संघाला १७८ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. आतापर्यंत भारतातील कसोटी क्रिकेटच्या ९२ वर्षांच्या इतिहासात असे घडले नव्हते. भारताने २२२ सामने अनिर्णित खेळले आहेत, तर भारताचा एक सामना रद्द झाला आहे.कसोटी क्रिकेटमध्ये पराभवापेक्षा जास्त विजय नोंदवणारा भारत हा जगातील पाचवा संघ ठरला आहे. याआधी ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तानच्या संघांनी अशी कामगिरी केली आहे. ऑस्ट्रेलियाने ८६६ सामन्यांपैकी ४१४ सामने जिंकले आहेत आणि २३२ सामने गमावले आहेत. इंग्लंड संघाने १०७७ सामन्यांपैकी ३९७ सामने जिंकले असून ३२५ सामने गमावले आहेत. त्याच वेळी, दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ४६६ कसोटी सामन्यांपैकी १७९ सामने जिंकले आहेत आणि १६१ सामने गमावले आहेत. याशिवाय ४५८ सामन्यांपैकी पाकिस्तानने १४८ सामने जिंकले असून १४४ सामने गमावले आहेत.दोन्ही संघांदरम्यान खेळल्या गेलेल्या या सामन्यात बांगलादेश संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. जिथे टीम इंडिया प्रथम फलंदाजीसाठी उतरली आणि भारताने १४४ धावांवर ६ विकेट गमावल्या. आर अश्विन आणि रवींद्र जडेजाने टीम इंडियाला त्या कठीण परिस्थितीतून बाहेर काढलं. अश्विनने ११३ धावांची तर जडेजाने ८६ धावांची खेळी खेळली. त्यामुळे टीम इंडियाने पहिल्या डावात ३७६ धावा करता आल्या. दोन्ही खेळाडूंनी टीम इंडियाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले.बांगलादेशकडून हसन महमूदने ५ विकेट घेतले. यानंतर बांगलादेशचा संघ फलंदाजीला आला आणि ते १४९ धावांवर सर्वबाद झाले आणि टीम इंडियाला २२७ धावांची आघाडी मिळाली. भारताकडून जसप्रीत बुमराहने त्या डावात सर्वाधिक ४ विकेट घेतल्या. २२७ धावांची आघाडी घेऊन भारतीय फलंदाज पुन्हा फलंदाजीसाठी उतरले आणि पुन्हा एकदा टीम इंडियाचा डाव अडचणीत आल्याचे दिसून आले. जेव्हा त्यांनी ६७ धावांत ३ विकेट गमावल्या होत्या. यानंतर ऋषभ पंत आणि शुबमन गिल यांनी शतके झळकावली आणि टीम इंडियाची धावसंख्या २८७ धावांपर्यंत नेली. भारताने केवळ ४ विकेट गमावल्या होते.कर्णधार रोहित शर्माने ५१४ धावांच्या आघाडीसह डाव घोषित केला आणि बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचे लक्ष्य दिले. या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचा संघ २३४ धावांवर ऑलआऊट झाला आणि टीम इंडियाने २८० धावांनी सामना जिंकला. या डावात अश्विनने भारतासाठी शानदार गोलंदाजी करत २१ षटकांत ८८ धावा देत ६ विकेट घेतले. अश्विनला त्याच्या अष्टपैलू कामगिरीसाठी सामनावीर म्हणून गौरवण्यात आले.

### विजयात अश्विनची भूमिका महत्त्वाची

अश्विनचा हे १०वा सामनावीर म्हणून पुरस्कार आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने मोठ्या सहजतेने जिंकला. भारताच्या विजयात आर अश्विनची भूमिका महत्त्वाची होती. आर अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावत भारताचा डाव सावरला आणि दुसऱ्या डावात विक्रमी ६ विकेट्स घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने मोठ्या सहजतेने जिंकला. भारताच्या विजयात आर अश्विनची भूमिका महत्त्वाची होती.

# ऑलिम्पियाड करंडक भारताकडून गहाळ

## बुद्धिबळ महासंघाची बेफिकिरी, पर्यायी बक्षिस वितरीत होण्याची शक्यता

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील सर्वोत्तम सांघिक कामगिरीसाठी देण्यात येणारा नोना गाप्रिंदाश्वाली फिरता करंडक भारताने दोन वर्षांपूर्वी जिंकला होता; मात्र भारताकडून हा करंडक हरवला आहे. जागतिक बुद्धिबळ महासंघाने हा करंडक परत करण्याची आठवण केल्यावर शोधाशोध सुरू झाली; पण त्यात अपयश येत असल्यामुळे पर्यायी करंडक तयार होत असल्याचे भारतीय बुद्धिबळ महासंघातील सूत्रांनी सांगितले.**



दोन वर्षांपूर्वी चेन्नईत बुद्धिबळ ऑलिम्पियाडचे आयोजन केले होते. त्यातील खुल्या; तसेच महिला विभागात भारताने कांस्य पदक जिंकले होते. या ऑलिम्पियाडमध्ये सर्वांगीण कामगिरी करणाऱ्या संघास गाप्रिंदाश्वाली फिरता करंडक देण्यात येतो. भारतास हा करंडक देण्यात आला. त्या वेळी तत्कालीन भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी तो जल्लोषात स्वीकारला.काही महिन्यांपूर्वी भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या निवडणुकीत पूर्णपणे नवी कार्यकारीणी निवडून आली. या कार्यकारीणीस अजूनही तो फिरता करंडक भारतातच आहे, हे जागतिक बुद्धिबळ महासंघाने याबाबत पत्र पाठवल्यावर समजले. त्या पत्रात हा विजेतेपदाचा फिरता करंडक सध्या ऑलिम्पियाड होत असलेल्या हंगेरीत घेऊन येण्याची सूचना करण्यात आली होती. जागतिक महासंघाच्या पत्रानंतर भारतीय महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्या करंडकाचा शोध सुरू केला. महासंघाच्या दिल्ली; तसेच चेन्नई कार्यालयात तपासणी करण्यात आली.

### चेन्नई कार्यालयात तपासणी

तमिळनाडू संघटना, त्या वेळी ऑलिम्पियाडच्या संयोजनात सहभाग असल्यामुळे तमिळनाडू सरकार, भारतीय संघातील खेळाडू, पदाधिकारी, मार्गदर्शक यांना विचारणा करण्यात आली. मात्र, प्रत्येकाने आपल्याला याबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगितले. काही भारतीय खेळाडूंनी तर या करंडकास आम्ही कधीही स्पर्श केलेला नाही आणि त्या दिवसाच्या बक्षिस समारंभानंतर कधीही पाहिलेला नाही, असेही नमूद केले.